Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2505S01V13P003

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research May'25
Issue–V(I), Volume–XIII

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची समाज उन्नतीसाठी ज्ञानसाधना

**डॉ. भारती कृ. सातपैसे**
गो. वा. महाविद्यालय नागभीड,
ता. नागभीड जि. चंद्रपूर
**E-mail–** bharatisatpaise123@gmail.com
**Mo. No. 7972288913**

**सारांश-**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज्यांचे जीवनचरित्र पाहता असे जाणवते की, त्यांनी ईश्वरप्राप्तीची प्रखर साधना करून समाजाच्या उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. लहानपणी त्यांना श्री आडकुजी महाराज यांच्या कृपादृष्टीने त्यांच्या जीवनाला एक निश्चित दिशा मिळाली. अशिक्षित व दरिद्री समाजाचे प्रबोधन करुण वास्तविकतेच्या जीवनाचा स्वीकार करून तत्कालीन परिस्थिती पाहता त्यांना इंग्रजाविरुद्ध पेटून उठायला भजन आणि खंजिरीच्या माध्यमातून शिकविले. वास्तविक जीवनचा आरसा समाजासमोर उभा केला. ग्रामीण भागात चैतन्य निर्माण केले. लोकांमध्ये, लोकांच्या स्वत:मधल्या असामान्य बुद्धिमत्तेचे दर्शन त्यांना घडविले. गावांना अंतर्बाह्य जागृत केले. अशिक्षित, अज्ञनी समाजासमोर ज्ञानाची कवाडे उघडी केली. महाराजांनी 'ग्रामगीतेत' धर्माचा एकांगी विचार केलेला नाही तर एकात्मतेने व समानतेने विचार केला आहे. महाराजाची ग्रामगीता ही लोकशिक्षणाचे विद्यापीठ आहे.

**बीज शब्द-** चिंतनशिलता, आध्यात्म, वास्तवदर्शी, चैतन्यमय, मानवतावाद, समाजप्रबोधन

**प्रस्तावना:**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे एक महान समाजसुधारक, आध्यात्मिक गुरु, संत, कवी व क्रांतिकारी विचारवंत होते. त्यांनी धर्म, समाज, मानवता आणि राष्ट्रासाठी ज्ञानाची कवाडे आयुष्यभर कार्य केले. त्यांचे जीवन म्हणजे सेवा, समता, कर्म आणि प्रेमाचा आदर्श आहे. आध्यात्मिक विचारासोबतच त्यांनी समाजजागृतीचे ही कार्य केलेले आहे. गांधीजीना अभिप्रेत असणा-या ग्रामाचे चित्र लोकांसमोर महाराजानी उभे केले. समाजामध्ये त्यांनी भरभरून आत्मविश्वास निर्माण केला. त्यांचामधला आळ्स काढून त्यांना कामाप्रती प्रेम निर्माण केले. स्व:अस्तित्व विसरलेल्या समाजामध्ये भजनातुन फुर्ती निर्माण केली. महाराज एक लोकशिक्षक होते. ग्रामशुद्धी, आत्मनिर्भरता, श्रमप्रतिष्ठा, आत्म:शुद्धी याकडे लोकांचे लक्ष केन्द्रित केले. तुकडोजी महाराजांनी आपले अध्यात्मिक शिक्षण आडकोजी महाराज यांना गुरू केल्यानंतर यांच्याकडून घेतले. त्यांनी खंजिरीच्या सहाय्याने भजन-कीर्तनाद्वारे समाज प्रबोधन सुरू केले. राष्ट्रसंतांनी देशभक्ती, स्वावलंबन, स्वच्छता आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे संदेश गावोगावी पोचवले व त्यांच्या अमूल्य विचारांमुळे जनतेत नवचैतन्य निर्माण झाले. इंग्रज सत्तेविरोधातही त्यांनी कीर्तनातून आवाज उठवला व सर्वधर्म संप्रदायाच्या लोकांना एकत्रित केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या भजनाच्या माध्यमातून समाजक्रांती घडविली. त्यांची किर्तनशैली इतकी प्रभावी होती की, स्वातंत्र्लढयात कितीतरी आबाल-वृध्द, बाल, तरूण त्यांच्या एका भजनाच्या प्रभावाने आपले सर्वस्व या भारतमातेला दयायला तयार होते. सामुदायीक प्रार्थनेचे महत्व, श्रमसेवेचे महत्व, गुरूदेव सेवा मंडळाची स्थापना हे सर्व कार्य त्यांच्या समाजसंघटनेचा एक भाग होता.

अंधश्रध्दा, व्यसनमुक्ती, समाजसुधारणा याबाबत त्यांनी 'ग्रामगीतेत' ठणकावून सांगितलेले आहे. मूल्यशिक्षणाचे महत्व त्यांनी स्पष्ट केलेले आहे. जीवनाभिमुख शिक्षणाला राष्ट्रसंतानी महत्व दिलेले आहे

**अभ्यासाचा उद्देश-**

१. राष्ट्रसंताच्या भजनाच्या माध्यमातून समाजजागृती याबाबत विश्लेषण करणे.

२. भजनातून व्यक्त होणा-या सुधारणावादी विचारांची समाजाला ओळख करून देणे.

३. राष्ट्रसंताच्या भजनाचा आजच्या समाजावर होणारा प्रभाव जाणून घेणे.

**जीवनचरित्राचा संक्षिप्त आढावा :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील 'यावली' गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साधे व आध्यात्मिकतेने भरलेले होते. त्यांच्या वडिलांचे नाव बंडोजी ब्रह्मभट्ट इंगळे आणि आईचे नाव मंजुळाबाई होते. त्यांचे पूर्ण नाव माणिक बंडोजी ब्रह्मभट्ट असे होते. लहानपणापासूनच त्यांना भजन, कीर्तन आणि योगसाधनेची ओढ होती. त्यांच्या वाणीतून आणि भजनातून व्यक्त होणारे विचार थेट जनतेच्या हृदयाला भिडत होते. मंदिरात बसलेल्या मूर्तीपेक्षा चैतन्यमय कर्तुत्ववान माणूस हा खरा देव होय. गावकरी, नागरिक यांनी आपल्या गावाचा हित वैयक्तिक हितापेक्षा सांभाळावं असाही संदेश दिलेला आहे. त्याचप्रमाणे अध्यात्मिकतेला कर्माशी जोडण्याचं काम राष्ट्रसंतांनी केलेल आहे. धर्म, अध्यात्म, समाजकारण या तिघांचाही तिहेरी बंध राष्ट्रसंतांनी गुंफलेला आहे. **राष्ट्रसंतांची समाधी व अंतिम काळ:**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा मुत्यू ११ऑक्टोबर १९६८ रोजी गुरुकुंज आश्रम मोझरी येथे झाला. अमरावतीजवळ मोझरीच्या 'गुरूकुंज आश्रमाची स्थापना' हे त्यांच्या आयुष्यातील लक्षणीय कार्य होय. गुरूकुंज आश्रम मोझरी येथे त्यांची समाधी आहे. त्यांनी गुरूकुंज आश्रम मोझरी येथून सामाजिक कार्याची सुरूवात केली होती. त्यांचे विचार कार्य आणि प्रेरणा आजही लाखो घराघरात आणि लाखो लोकांच्या हृदयात जिवंत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची समाज उन्नतीसाठी ज्ञानसाधना केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे एक महान समाजसुधारक, आध्यात्मिक गुरु, संत, कवी व क्रांतिकारी विचारवंत होते. त्यांनी धर्म, समाज, मानवता आणि राष्ट्रासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांचे जीवन म्हणजे सेवा, समता, कर्म आणि प्रेमाचा आदर्श आहे.

**ज्ञानसाधना आणि समाज उन्नती:**

तुकडोजी महाराजांनी आपले अध्यात्मिक शिक्षण आडकोजी महाराज यांना गुरू केल्यानंतर यांच्याकडून घेतले. त्यांनी खंजिरीच्या सहाय्याने भजन-कीर्तनाद्वारे समाज प्रबोधन सुरू केले. राष्ट्रसंतांनी देशभक्ती, स्वावलंबन, स्वच्छता आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे संदेश गावोगावी पोचवले व त्यांच्या अमूल्य विचारांमुळे जनतेत नवचैतन्य निर्माण झाले. इंग्रज सत्तेविरोधातही त्यांनी कीर्तनातून आवाज उठवला व सर्वधर्म संप्रदायाच्या लोकांना एकत्रित केले.

भारताच्या राष्ट्रनिर्माणासाठी दिलेल्या योगदानामुळे त्यांना ''राष्ट्रसंत'' ही पदवी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी बहाल केली. महाराजांचे कार्यकर्तुत्व हीच त्यांची ओळख होती; यासाठी त्यांनी ग्रामविकासाला महत्व दिले. ग्राम म्हणजेच खेडे उन्नत झाल्याशिवाय समाजाची उन्नती होणार नाही पर्यायाने भारताची प्रगती होणार नाही हे त्यांच्या दूरदृष्टीने आधीच हेरले होते. यासाठी त्यांनी ग्रामविकासाला महत्व दिले.

**ग्रामविकासाची संकल्पना:**

तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगीता' या ग्रंथातून ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडले. त्यांनी आत्मनिर्भर ग्रामरचनेवर भर दिला. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, ग्रामोद्योग आणि सामाजिक समतेवर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. अंधश्रद्धा, जातीभेद, कर्मकांड यांचा त्यांनी तीव्र विरोध केला. त्यांनी स्त्रीशिक्षण व स्त्री-सशक्तीकरणावरही भर दिला. महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले.
ग्रामगीतेतील एक महत्त्वाचा श्लोक:

**''विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय।**
**शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन जय करावया।।२०।।''**

ग्रामगीतेतील हा श्लोक त्यांच्या मानवतावादी दृष्टिकोनातून व सामाजिक सुधारणासाठी विशेष उपयोगी आहे. राष्ट्रनिर्मितीसाठी योग्य नेतृत्व कसं हवं याचं उदाहरण स्पष्ट करणारा राष्ट्रसंतांच्या विचार सामर्थ्याच प्रगल्भ दर्शन त्यांच्या 'ग्रामगीता' या ग्रंथात आढळून येते. महाराजांना राष्ट्र निर्मितीसाठी शिक्षणाची गरज वाटली. त्यामागे त्यांची समाजासाठी असणारी दूरदृष्टी, मूल्य प्रधान शिक्षणाची व्यवस्था, ग्रामीण भारताचा विकास या मागे त्यांची ठाम श्रद्धा होती म्हणून ग्रामगीतेतील हा महत्त्वाचा श्लोक आपल्याला मानवी व्यक्तिमत्व, त्याच्या पुढील उद्देश आणि कार्य असा राष्ट्रसंतांनी कार्याचा आकृतीबंध मानवाला ठरवून दिलेला दिसतो. तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता ही ग्रामनाथला अर्पण केलेली आहे. त्यामागे गोड पण अर्थपूर्ण अशी विचारधारा आहे.

**ग्रामनाथ म्हणजे कोण?-** असा प्रश्न जरी आपणाला पडत असला तरी ग्रामनाथ ही संकल्पना म्हणजे गावाचा मालक आधारस्तंभ आणि सेवक होय. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या दृष्टिकोनातून ग्रामनाथ म्हणजे गावाच्या सुखदुःखात सहभागी होणारा, गावाच्या उन्नतीसाठी अहोरात्र झटणारा आणि जागरूक असणारा असा सुजाण नागरिक होय. जो सुजाण नागरिक गावाच्या हितासाठी स्वहिताला प्राधान्य न देता तो समाजहित साध्य करू पाहतो असा ग्रामनाथ व निष्कलंक माणूस राष्ट्रसंताला अभिप्रेत आहे.

१) ग्रामविकासाला सर्वोच्च स्थान देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कर्मालाही प्रतिष्ठा मिळवून देतात. श्रमिक, कार्यकर्ता आणि समाजसेवक यांना परमेश्वराप्रमाणे स्थान देतात. म्हणजेच तात्पर्याने गावासाठी जो धडपडतो तोच खरा देव असतो आणि तोच गावाचा उद्धार करण्याच सामर्थ स्वतःमध्ये ठेवतो. असा संदेश राष्ट्रसंतांनी समाजाला दिलेला आहे.

२) राष्ट्रसंतांना अभिप्रेत असणारा आत्मनिर्भर आणि स्वावलंबी माणूस, धार्मिक नव्हे तर आध्यात्मिक माणूस हवा आहे. तो माणूस स्वतःच्या कष्टावर जगणारा, कोणावरही अवलंबून नसणारा माणूस त्यांनी आदर्श मानलेला आहे. म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या ग्रामगीतेतील अर्पणपत्रिकेत म्हणतात,

**सर्व ग्रामासि सुखी करावे। अन्न वस्त्र पात्रासि दयावे**
**परि स्वतः दुःखचि भोगावे। भुषण तुझे ग्रामनाथा।।**

**राष्ट्रसंताचे शिक्षण विषयक विचार-**

तुकडोजी महाराजांचे संपूर्ण जीवनतत्व त्यांच्या 'ग्रामगीता' या ग्रंथात सामावलेले आहे. सर्वसामान्य जनतेच्या उद्धारासाठी दिवसरात्र जागृत राहून कार्य करणारे संत त्याचप्रमाणे लोकशिक्षक म्हणून तुकडोजी महाराज असामान्य व्यक्तीमत्व आहे.

**जीवनाभिमुख शिक्षण:**

ज्या शिक्षणामध्ये केवळ शिक्षण हे नोकरीसाठी नसावे तर जीवन जगण्याची कला शिकविणारे शिक्षण प्रत्येक व्यक्तीने घ्यावे. त्यामध्ये स्वावलंबन, चरित्र, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी याचा विकास शिक्षणातून व्हायला हवा आणि त्याकडे प्रत्येक व्यक्तीने लक्ष द्यावे.

**शैक्षणिक कार्यामध्ये मूल्यशिक्षण असायला हवे :**

काम हेच पूजा म्हणून केवळ शिक्षण पुस्तकी ज्ञान मानता कामा नये तर शारीरिक श्रम, शेती, हस्तकला, ग्रामोद्योग याचाही समावेश शिक्षणामध्ये असायला हवा म्हणजे कौशल्यपूर्ण शिक्षण प्रत्येक व्यक्तीला घेण्याचा अधिकार असावा असा राष्ट्रसंतांना वाटतें.

**नैतिक आणि आध्यात्मिक शिक्षण :**

शिक्षणातून चरित्रवान आणि जबाबदार नागरिक घडावा यावर त्यांचा भर होता. मूल्यशिक्षण आणि आध्यात्मिक दृष्टिकोनाची जोपासना प्रत्येकाने आपल्या हृदयात नव्हे तर कार्यकर्तृत्वात करावी आणि त्यासाठी समाजाची बांधिलकी जोपासणे गरजेचे आहे. समाजाप्रती आपले कर्तव्य प्रत्येकाने समजून उमजून त्याप्रमाणे समाजामध्ये प्रबोधनाचं कार्य करावे,

**'यावे ज्ञानासाठी आणि निघावे सेवेसाठी'**

हे ब्रीदवाक्य आपल्या हृदयात जोपासून प्रत्येकाने आपले कर्तव्य प्रामुख्याने निभावावे व देशसेवेसाठी सज्ज असावे.

**ग्रामीण शिक्षणाची गरज:**

राष्ट्रसंतानी ग्रामीण भागात, त्याचप्रमाणे ग्रामविकासासाठी ग्रामीण भागामध्ये शाळा, ग्राम शाळा आणि प्रायोगिक शिक्षण हे महत्त्वाचे मानले. याबद्दल त्यांनी ग्रामगीतेतही म्हटलेले आहे,

**''विद्या ही असे जी देईल स्वावलंबन,**
**घडे त्यातून सज्जन, सन्मार्गी जन''**

**शिक्षणातून राष्ट्रनिर्मिती:**

शिक्षण हा राष्ट्र निर्मितीचा कणा आहे असे राष्ट्रसंतांना वाटायचे आणि त्यानुसार त्यांनी समाजामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून समाज उन्नती साधता येते यासाठी ते ग्रामशिक्षणावर भर देताना दिसतात. शिक्षणातून देशभक्ती, समाजसेवा व नीतिमूल्य रुजवली गेली पाहिजे असे राष्ट्रसंत नेहमी म्हणायचे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शिक्षण विषयक विचार आजच्या काळातही तितकेच लागू पडणारे दिसतात. विशेषतः समाजामध्ये नैतिक शिक्षणाची गरज ध्यानात घेऊन प्रत्येक व्यक्तीने घराघरात कुटुंबात नैतिक शिक्षणाचे पाठ पुरविले पाहिजे.

**राष्ट्रनिर्मितीसाठी राष्ट्रसंताचे विचार:**

राष्ट्रनिर्मितीसाठी राष्ट्रसंतांनी आपले दुरगामी विचार समाजासमोर मांडले. समाजाचे मूळ बदलवण्यासाठीची दुरदृष्टी, मूल्यप्रधान शिक्षणाची भूमिका आणि ग्रामीण भारताचा विकास ही प्रक्रिया केवळ माहिती देणारी नव्हती तर व्यक्तिमत्व घडवणारी आणि राष्ट्र उभारणारी एक महाशक्ती होती.

**सुजान नागरिक घडविण्यासाठी:**

चरित्रसंपन्न, जागरूक आणि जबाबदार नागरिक बनवणं हे राष्ट्राच्या अखंडतेसाठी महत्त्वाचं होतं. शिक्षणाच्या माध्यमातून माणूस विवेकशील, सच्चा आणि सामाजिक भान जपणारा बनतो.

**अंधश्रद्धा आणि अज्ञान निर्मूलनासाठी:**

सुशिक्षित माणूस विचार करतो विचारात बदल करतो आणि समाजात येणा-या नवीनतेचा नेहमी स्वीकार करतो म्हणून शिक्षण अतिशय महत्त्वाच आहे. शिक्षणामुळे माणूस अंधश्रद्धा, कर्मकांड आणि परंपरागत गुलामगिरी पासून मुक्त होण्याचा प्रयत्न करतो. त्यामध्ये नेहमी नवीनता स्वीकारण्याची धडपड निर्माण होते आणि तो समाजामध्ये मूल्यात्मक संस्कृती हस्तांतरित करून ती संस्कृती टिकवण्याचा प्रयत्न करतो.

**ग्राम विकासासाठी नैतिक आणि मूल्यधारीत समाजासाठी:**

समाजामध्ये नीती, करुणा, सेवा आणि सहिष्णुता ही मूल्ये प्रत्येक व्यक्तीला रुजवता आली पाहिजे म्हणून राष्ट्रसंत म्हणतात की,

**''नुसते नको उच्च शिक्षण | हे ते गेले मागील युगी लपोंन |**
**आताव्हावा कष्टक, बलवान | सुपुत्र भारताचा ||९||''**

स्वावलंबी आणि आत्मनिर्भर भारतासाठी व राष्ट्रनिर्मितीसाठी श्रमशील सर्जनशील आणि उत्पादनक्षम व्यक्ती निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे आणि हे सर्व शिक्षण खरया अर्थानें व्यक्तीला जीवन जगण्याचा मार्ग व स्वावलंबन शिकवत असते असं राष्ट्रसंताला नेहमीच वाटत होतं आणि त्यानुसार त्यांनी समाजामध्ये आपल्या भजनाच्या कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

**राष्ट्रसंताचे समाज प्रबोधनाचे साधन व राष्ट्रीय चळवळीतील सहभाग:**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे समाज प्रबोधनाचे साधन म्हणजे भजन होय. हे भजन खंजिरीच्या माध्यमातून ते नेहमीच करायचे. त्यांनी भजन हे केवळ आध्यात्मिक साधन म्हणून न वापरता खंजिरीच्या माध्यमातून राजकीय आणि सामाजिक क्रांती घडवण्याचं प्रभावी कार्य केलेले आहे. त्यांनी खंजिरीच्या ठेक्यावर लोकांच्या मनामध्ये परिवर्तनाची बीज रोवून एका नव्या क्रांतीचा गजर केलेला आहे. त्यांनी भजनाच्या माध्यमातून महात्मा गांधी, लोकमान्य टिळक आणि नेहरू सारख्या नेत्यांचे कार्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचा महत्त्वाचा प्रयत्न केलेला होता.

सामाजिक क्रांतीसाठी भजनाचा उपयोग करून अंधश्रद्धा निर्मूलन, कर्मकांड, जातीपाती, भोंदू बाबांच्या विरोधात भजनामधून आवाज उठवलेला आहे,

**''मनी नाही भाव आणि देवा मला पाव,**
**देव बाजारचा भाजीपाला नाहीरे!''**
**पेज नं. २२५ ( रा. तु. म. व्यक्ती आणि वाङ्मय)**

या माध्यमातून देवाच्या नावावर व्यापार करणा-या लोकांना ठणकावून सांगितलेले आहे. शोषित आणि दुर्बलाच प्रतिनिधित्व स्त्री-पुरुष समता, शिक्षण व स्वच्छतेचा प्रचार, व्यसनमुक्ती यावर त्यांनी भजनाच्या माध्यमातून भर दिलेला आहे. दलित, कामगार, शेतकरी यांच्या वेदना मांडून त्यांच्यासाठी त्यांनी आवाज उठवलेला आहे.

**राष्ट्रसंताचे भजन म्हणजे जनजागृती:**

राष्ट्रसंतांनी १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात सक्रिय सहभाग घेतलेला होता व त्यासाठी त्यांनी तुरूंगवासही भोगला. त्यांनी भजनाच्या माध्यमातून लोकांना इंग्रजा विरोधात जागृत केलेले होते. प्रत्येकाच्या मनामध्ये स्वराज्याची प्रेरणा जागृत केली होती. स्वराज्याच्या प्रेरणेची ज्योत पेटवलेली होती. त्यांना स्वराज्याचे महत्त्व आपल्या भजनाच्या माध्यमातून पटवून दिलेलं होतं. देशभक्तीचे, देश, प्रेमाचे, बलिदानाचे, स्वावलंबाचे या सर्व विषयावर वेगवेगळी भजन त्यांनी निर्माण केलेले होती. त्यामुळे लोकांना राष्ट्रसंत हे नेहमी जवळचे वाटायचे. सामुदायिक प्रार्थना, ध्यान, श्रमसेवा हा त्यांचा आवडता विषय होता. या माध्यमातून समाज संघटित करणं हा एक मुख्य उद्देश राष्ट्रसंतांनी समोर ठेवून 'गुरुदेव सेवा मंडळाची' स्थापना केली होती. राष्ट्रसंत म्हणजे एक जिवंत प्रेरणा होते. राष्ट्रसंताचे विचार म्हणजे समाज उन्नतीसाठी ज्ञानसाधना ख-या अर्थाने होती आणि ते त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत जोपासली.

**संदर्भग्रंथः**

१. ग्रामगीता - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
प्रकाशक - म.शी. रणदिवे,
अभा. गुरूदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम मोझरी
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज - व्यक्ति आणि वांङ्मय
संपादनः डॉ. अक्षयकुमार काळे
३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मौलिक विचार- (सं.लेखन- प्रा.राजेंद्र मुंढे)(लोकवांङमय प्रकाशन)
४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज-(चरित्रलेखक- डॉ.भास्कर गिरधारी)